सुख...

या सुखाची रीत कैसी सांग ना
पावलांच्या मागुती चाहूल ना ॥ १ ॥

सापडे कोणा कसे कोठे तरी
त्या दिशेची वाट कोठे सांग ना ॥ २ ॥

शोधतो सत्यात मी हे स्वप्न की
स्वप्न की हा तर्क खोटा सांग ना ॥ ३ ॥

गवसले हाती जयाला तो सुखी
गंध तरी मिळतो मला का सांग ना ॥ ४ ॥

गात्र सारे तिष्ठले सुख इच्छिती
तिष्ठणे ही रीत का मज सांग ना ॥ ५ ॥

भावनांचा वेग हा मंदावे जरी
साधतो का लय सुखाशी सांग ना ॥ ६ ॥

ओळखू कैसे सुख बिलगे जरी
सावलीसा स्पर्श कैसा सांग ना ॥ ७ ॥

© सपु, www.saarthbodh.com